**कायम विना अनुदान तत्वावरील प्राथमिक शाळा परवानगीचे आदेश.**

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: नप्राशा-१७०६/(१०२/२००६)/प्राशि -३
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :१६ मे, २००६.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई, कोल्हापूर, नाशिक,औरंगाबाद, लातूर, नागपूर, अमरावती.

**विषय : सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त (मराठी व इतर माध्यमाच्या) खाजगी प्राथमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात नविन प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ३२३ (तीनशे तेवीस ) शैक्षणिक संस्थांना तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त (मराठी,हिंदी,उर्दू, गुजराथी ). सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास " जून २००५" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : पीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे. परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेकडून रु.२०/- एवढया रकमेच्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही, असे हमी पत्र संस्थेकडून प्रथम लिहून घ्यावे. सदरहू हमीपत्र आपल्या कार्यालयातील संबंधीत नस्तीवर कायम स्वरुपी जतन करुन ठेवावे व त्याच्या प्रती प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात. त्याची प्रत शासनासही माहितीस्तव सादर करावी.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र क्र.पीएलएस १०००/(५५७/२०००)(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या

अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ सदर शासनपत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००६०५१६२१०९०६००१ असा आहे.

(भि.द. मंता)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

शासन पत्र क्रमांक नप्राशा-१७०६/(१०२/०६)/प्राशि-३,दिनांक : १६ मे २००६ चे सहपत्र

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदानित मराठी व उर्दू माध्यमाच्या परवानगी द्यावयाच्या प्राथमिक शाळांची नांवे

## जिल्हा - औरंगाबाद

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | वर्धमान मेडीकल ॲण्ड एज्युकेशन संस्था, मुकूंदवाडी, औरंगाबाद | मेनरोड, मुकूंदवाडी, औरंगाबाद | मराठी | १ ली |
| २ | श्री.स्वामी सत्यानंद सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, सिडको, एन-२, औरंगाबाद | एन-२, सिडको,औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ३ | बालविकास जनकल्याण व सांस्कृतिक सेवाभावी शिक्षण प्रसारक मंडळ, हनुमान नगर, एन-४, औरंगाबाद | न्यु एस.टी. कॉलनी, एन-२, सिडको,औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ४ | महात्मा फुले ग्रंथालय, एकनाथनगर, औरंगाबाद. | सर्व्हे क्र.१२, सिडको, विमानतळाजवळ, एन-२,औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ५ | जनसंवाद शैक्षणिक व बहुउददेशीय सेवाभावी संस्था, विठ्ठलनगर, सिडको,औरंगाबाद | म्हाडा कॉलनी, (एअरपो[illegible] जवळ), सिडको, एन-२ च्या बाजूस,औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ६ | बायजाई बहुउददेशीय सेवाभावी शिक्षण संस्था,औरंगाबाद. | श्रीराम नगर, सिडको,औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ७ | वर्धमान मेडीकल ॲण्ड एज्युकेशन संस्था, औरंगाबाद | रामनगर, चिकलठाणा,औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ८ | कै.श्रीमती कलाबाई बहुउददेशीय सामाजिक संस्था, संत ज्ञानेश्वर नगर,एन-९, हडको,औरंगाबाद. | श्रीकृष्णनगर जवळ, एन-[illegible] एम-२,प्लॉट नं.११, हडको,औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ९ | जय महाराष्ट्र शिक्षण प्रसारक संस्था, खैरे निवास, वसंत भवन, मछली खडक,औरंगाबाद | एन-९, सिडको,औरंगाबाद | मराठी | १ ली |
| १० | गोदावरी मल्टीपरपज चॅरीटेबल ट्रस्ट,हडको,औरंगाबाद | सिडको,औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ११ | श्री.छत्रपती शिवाजी महाराज लोककल्याणकारी संस्था, औरंगाबाद | एन-११, हडको,औरंगाबाद | मराठी | १ ली |
| १२ | सोनामाता शिक्षण संस्था, एन-९,सिडको,औरंगाबाद | पिसादेवी रोड,औरंगाबाद | मराठी | १ ली |
| १३ | सोनामाता शिक्षण संस्था,एन-९ सिडको,औरंगाबाद. | जाधववाडी औरंगाबाद | मराठी | १ ली |
| १४ | मिराई शिक्षण प्रसारक मंडळ,औरंगाबाद | बायजीपूरा (इंदिरानगर),औरंगाबाद | मराठी | १ ली |